प्रकरण ४ थे

# जहालवादाचा उदय व वाढ

१ ) जहालवादाच्या उदयाची कारणे व त्यांची विचारसरणी

२ ) सुरत काँग्रेस १९०७

३ ) लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक व बिपीनचंद्र पॉल यांची कामगिरी

४ ) होम रूल चळवळ

## १ ) जहालवादाच्या उदयाची कारणे व त्यांची विचारसरणी :-

इ.स.१८८५-१९०७ हा कालखंड जहालवादाचा उदय व विकासाचा कालखंड मानला जातो. इ.स.१८८५ पासून मवाळ नेत्यांनी काँग्रेसच्या अधिवेशनात अनेक ठराव पास करून ब्रिटिशांकडे पाठवले. पण ब्रिटिश सरकार त्याची फारशी दखल घेत नसे. अर्ज, विनंत्या, निवेदने, शिष्टमंडळे या सनदशीर मार्गांचा अवलंब मवाळांनी केला होता. मवाळांची विचारसरणी व एकूण कार्यपद्धतीच मान्य नसणारा एक वर्ग काँग्रेसमध्ये कार्यरत होता. त्यास जहालवादी (Extremists) असे नाव होते. लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, अरविंद घोष हे जहालवाद्यांचे नेते होते. काँग्रेस ही मूठभर आंग्लशिक्षित उच्च मध्यमवर्गीय शहरांत वास्तव्य करणाऱ्या लोकांपुरती मर्यादित न ठेवता सर्वसामान्य जनतेला काँग्रेसमध्ये दाखल करून घेतले तरच ती राष्ट्रीय संघटना होईल व तिचे दडपण ब्रिटिश राज्यकर्त्यांवर येईल असे या जहाल गटाला वाटत होते. जहाल व मवाळ असे भिन्न विचारधारा व भिन्न कार्यपद्धती असणारे दोन गट काँग्रेसमध्ये कार्य करत होते. जहालवाद्यांनी मवाळांची विचारसरणी व कार्यपद्धती यावर उघड टीका सुरू केली. स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व ब्रिटिश वस्तूंवर बहिष्कार हा मवाळांना मान्य नसणारा कार्यक्रम जहालांनी पुढे केला होता. शेवटी १९०७ मध्ये सुरत येथील काँग्रेसच्या अधिवेशनात जहाल व मवाळ यांच्यात मतभेद होऊन जहालांचा गट काँग्रेसच्या बाहेर पडला. इ.स.१९१६ च्या लखनौ अधिवेशनापर्यंत हा गट काँग्रेसच्या बाहेरच होता.

**जहालमतवाद्यांच्या उदयाची कारणे :-**

**१ ) दुष्काळाबाबत सरकारची निष्क्रियता :-** ब्रिटिश राजवटीत भारतातील भिन्न प्रांतांत वारंवार दुष्काळ पडले. डब्ल्यू. एस. लिली या लेखकाने 'India & Its Problems' या ग्रंथात इ.स. १८५१ ते १८७५ या काळात दुष्काळात ५० लक्ष तर इ.स.१८७६ ते १९०० या काळात दुष्काळात २ कोटी ५० लक्ष लोक मृत्यू पावले अशी आकडेवारी दिली आहे. ब्रिटिश अधिकारी या दुष्काळाच्या काळातही शेतकऱ्यांकडून शेतसारा गोळा करत. उपासमारीकडे सरकारने दुर्लक्ष केले. सरकारची दुष्काळ निवारण यंत्रणा ही निष्क्रिय होती. भयंकर स्वरूपाच्या दुष्काळाकडे सरकाने दुर्लक्ष केल्याने तरुण संतप्त होऊन जहालवादी विचारांकडे आकर्षिले गेले.

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

फाळणीचा निर्णय घेतला. भारतीयांना तुच्छ लेखणारी विधाने त्याने जाहीरपणे व्यक्त केली. कर्झन म्हणत असे की, 'राष्ट्रीय सभा व राष्ट्रीयत्व यांचा शांतपणे मृत्यू घडून येईल.' परंतु कर्झनची ही भविष्यवाणी खोटी ठरली. कर्झनच्या एकूण धोरणामुळे निष्क्रिय राष्ट्रीय सभा सक्रिय झाली व राष्ट्रीयत्वाची वाढही भारतात कर्झनच्याच काळात खूप जोमाने झाली. कर्झनच्या एकतंत्री व अनियंत्रित राजवटीची तुलना टिळकांनी औरंगजेबाच्या राजवटीशी केली होती. बंगालच्या फाळणीचा निर्णयही त्याने घेतला होता. राष्ट्रवादाची भावना दडपून टाकणे हाच त्यामागचा हेतू होता. कर्झनच्या या एकूण धोरणामुळे जहालमतवाद्यांचा उदय होण्यास मदतच झाली.

**६ ) इंग्रजांचा वंशश्रेष्ठत्वाचा अहंकार :-** इंग्रज लोक स्वत:ला वांशिकदृष्ट्या श्रेष्ठ समजत व हिंदी जनतेशी उद्दामपणे वागत. पहिल्या अफगाण युद्धाचा दीड कोटी रुपयांचा खर्च भारताला सोसावा लागला. २०,००० भारतीय सैनिक या युद्धात मारले गेले होते. ब्रिटिशांचा धर्म व संस्कृती ही भारतीयांपेक्षा श्रेष्ठ आहे अशी त्यांची समजूत होती. भारतीय व ब्रिटिश या दोघांनी केलेल्या समान गुन्ह्याबद्दल शिक्षा मात्र समान नव्हती. दक्षिण आफ्रिकेत मजुरी व व्यापारासाठी गेलेल्या भारतीय लोकांना भयंकर वर्णद्वेषाला तोंड द्यावे लागे. ठरावीक शाळा, हॉस्पिटल, हॉटेल व रेल्वेचा प्रथम श्रेणीचा डबा येथे भारतीयांना प्रवेश मिळत नव्हता. कर्झनने तर भारतीय लोक वंशाने व संस्कृतीने कनिष्ठ आहेत, त्यांना लोकशाहीचे अधिकार देऊ नयेत अशी जाहीर विधाने केली होती. मुलकी, लष्करी व न्यायव्यस्थेतील उच्च पदे भारतीयांना मिळत नसत. भारतीय लोक उच्च पदांसाठी अपात्र आहेत, उच्च पदे फक्त युरोपियन लोकांनीच उपभोगावीत अशीही जाहीर भूमिका कर्झनने घेतली होती. या वंशश्रेष्ठत्वाच्या अहंकाराचा परिणाम म्हणून काँग्रेसमधील तरुणांचा एक गट जहाल विचारांचा बनला.

**७ ) लॉर्ड कर्झनचे परराष्ट्र धोरण :-** लॉर्ड कर्झन हा साम्राज्यवादी धोरणाचा कट्टर पुरस्कर्ता होता. त्याच्या महत्त्वाकांक्षी स्वभावामुळेच चीन, तिबेट व अफगाणिस्तान या देशांशी तंटे निर्माण झाले होते. हे सीमा तंटे सोडवण्यासाठी त्याने भारतीय लष्कराचा उपयोग केला, एवढेच नव्हे तर युद्धाचा खर्चही भारतीयांवर लादला होता. ब्रिटिशांच्या साम्राज्यविस्तारासाठी भारतीयांना रक्त सांडावे लागणे व करांचा बोजा सहन करावा लागणे ही बाब जहाल तरुणांना आवडली नाही.

**८ ) आंतरराष्ट्रीय घटनांचा जहाल राष्ट्रवाद्यांवर पडलेला प्रभाव :-** वसाहतवादविरोधी जे लढे किंवा देशाच्या ऐक्यासाठी जे लढे जगात त्या काळात लढले गेले त्याचा प्रभाव भारतातील जहाल राष्ट्रवाद्यांवर पडणे साहजिकच होते. इटाली या देशात जोसेफ मॅझिनी, काऊंट काव्हूर व गॅरिबाल्डी या तिघांच्या नेतृत्वाखाली एकीकरणाची चळवळ झाली. विशेषत: जोसेफ मॅझिनी हा भारतीय राष्ट्रीय चळवळीला स्फूर्तिदायक ठरला. जर्मनीचेही एकीकरण बिस्मार्कच्या नेतृत्वाखाली पूर्ण झाले. इजिप्त, इराण, तुर्कस्तान या देशांतही

**११ ) हिंदू धर्म व संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाची चळवळ :-** या चळवळीचे नेतृत्व स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, टिळक, रवींद्रनाथ टागोर, लाला लजपतराय, अरविंद घोष आदी व्यक्तींनी केले. हिंदी राष्ट्रवाद हा हिंदू संस्कृतीचेच एक अंग आहे असे या सर्वांना वाटत होते. प्राचीन भारतीय धर्म, संस्कृती, तत्त्वज्ञान आदी क्षेत्रांतील भारतीयांचा वारसा या मंडळींनी भारतीयांपुढे मांडून त्यांना जागृत केले. पाश्चात्त्य संस्कृती व धर्मापेक्षा भारतीय संस्कृती व धर्म श्रेष्ठ आहे असा त्यांचा युक्तिवाद होता. व्हॅलेंटाईन चिरोलने विवेकानंदांचा उपदेश हे राष्ट्रीय आंदोलनाचे कारण आहे असे म्हटले होते.

**१२ ) भारतीय इतिहासातून जहालांना मिळालेली प्रेरणा :-** हिंदी तरुणांनी शिवाजी महाराज, तात्या टोपे, झाशीची राणी, महाराणा प्रताप यांच्यापासून प्रेरणा घेतली. स्वा. सावरकरांनी लिहिलेल्या 'भारतीय इतिहासाची सहा सोनेरी पाने' व '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथांनीही जहाल राष्ट्रवादाच्या निर्मितीस खतपाणी घातले. बंगालमध्ये कालीची तर महाराष्ट्रात गणपतीची लोक उपासना करू लागले. आर्य समाज, रामकृष्ण मिशन, थिऑसॉफिकल सोसायटीने सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या चळवळीस गती दिली. या सर्व व्यक्ती व संस्था यांचे लिखाण, विचार व प्रयत्न यांचा परिणाम म्हणून जहाल राष्ट्रवादास गती प्राप्त झाली.

**१३ ) बंगालची फाळणी ( इ.स. १९०५ ) :-** जहाल राष्ट्रवादाच्या निर्मितीचे हे महत्त्वाचे कारण आहे. बंगाल प्रांताचा प्रचंड आकार,लोकसंख्या व प्रशासकीय सोय ही कारणे पुढे करून कर्झनने बंगालची फाळणी केली असली तरी त्यामागचा खरा हेतू भारतीय नेत्यांच्या लक्षात आला होता. हिंदू-मुस्लिम यांच्यात फूट पाडणे, मुस्लिमांना खुश करणे हा या फाळणीचा हेतू होता. या फाळणीच्या विरोधी संपूर्ण भारतात आंदोलन सुरू झाले. **सुरेंद्रनाथ बॅनर्जी** या मवाळ नेत्याने 'बंगालच्या फाळणीची घोषणा आमच्यावर एखाद्या बॉम्बगोळ्याप्रमाणे कोसळली. हा आमचा अपमान आहे, अवहेलना व फसवणूक आहे. बंगाली लोकांच्या ऐक्याला व अस्मितेला धक्का आहे' असे म्हटले. बंगालच्या फाळणीची समस्या राष्ट्रीय आहे ही जाणीव ठेवून त्याविरुद्ध टिळकांनी आंदोलन सुरू केले. याचवेळी जहालांनी आपला स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हा चतु:सूत्रीचा कार्यक्रम घोषित केला. विशेषत: विदेशी वस्तूंच्या बहिष्काराला व्यापक स्वरूप देशभरांतून प्राप्त झाले. स्वदेशी वस्तूंचा वापर वाढला. बंगाल व महाराष्ट्रात राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार झाला व राष्ट्रीय शिक्षणसंस्थांची स्थापना करण्यात आली. कलकत्ता येथे राष्ट्रीय शिक्षण समिती स्थापन करण्यात आली. बंगालच्या फाळणीविरुद्ध देशभर जी चळवळ उभी राहिली त्यामुळे संपूर्ण देशात एक नवी चेतना, प्रेरणा, राष्ट्रासाठी त्याग करण्याची भावना निर्माण झाली. जहाल राष्ट्रवादाच्या विकासाला गती देण्याचे फार मोठे काम बंगालच्या फाळणीविरोधी आंदोलनाने केले. **मा. गोपाळ कृष्ण गोखले यांची प्रतिक्रिया यासंदर्भात फार बोलकी आहे. ते म्हणतात,** 'आज तरुणवर्ग विचारू लागला आहे की, घटनात्मक मार्गाचा परिणाम जर

**जहालांचा कार्यक्रम (Programme of Extremists) :-**

टिळक, लाला लजपतराय, अरविंद घोष व बिपिनचंद्र पाल या जहाल नेत्यांनी जो मार्ग, विचार स्वातंत्र्यप्राप्तीसाठी हाताळला तो 'जहालांची चतुःसूत्री' या नावाने ओळखला जातो.

१) स्वराज्य २) स्वदेशी ३) बहिष्कार ४) राष्ट्रीय शिक्षण.

भारतातील सुशिक्षित पांढरपेशा वर्गाने देशी कापड वापरण्याचा निश्चय करावा, विदेशी वस्तू स्वस्त, टिकाऊ व किमतीस कमी आहेत असे त्यांनी सांगू नये असे टिळकांनी म्हटले होते. औद्योगिक, राजकीय, सामाजिक, नैतिक व सांपत्तिक अशा सर्व अर्थाने स्वदेशी चळवळीची आवश्यकता व उपयोगिता टिळकांनी सांगितली. विदेशी वस्तूंच्या वापरामुळे पैसा परदेशांत जातो, देशी उद्योग बंद पडतात व बेकारी वाढते असे टिळक म्हणत.

टिळकांनी 'बहिष्कार' या शस्त्रासंबंधी म्हटले, 'आमच्याकडे ब्रिटिशांशी लढण्यासाठी शस्त्रे नाहीत. आम्हाला त्याची गरजही नाही. आमच्याकडे बहिष्कार हे एक शक्तिशाली शस्त्र आहे. इंग्रज हे आमच्या साहाय्यावरच राज्यकारभार करत आहेत. आम्हाला आमच्या स्वराज्याच्या राज्यकारभाराचा ताबा हवा आहे. त्यासाठी बहिष्काराच्या शस्त्राने आपण ब्रिटिशांना नमवले पाहिजे. बहिष्काराचा मार्ग हा राजकीय गुन्हा ठरत नाही. विद्यार्थी, शेतकरी व कष्टकऱ्यांनी बहिष्काराची चळवळ हाती घेतली तर मध्यम व श्रीमंत वर्गातील पुढारीही विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकतील.' अरविंद घोष यांनी प्रार्थना, अर्ज, विनंत्या आदी मार्गांचा त्यांच्या लिखाणात वारंवार धिक्कार कला होता. त्यांनी ३ मार्ग सुचविले होते. १) प्रत्यक्ष, क्रांतिकारक कृतीचा मार्ग २) राष्ट्राच्या उज्ज्वल परंपरा व संपन्न वारसा यांचे स्मरण करून देणे. ३) सविनय प्रतिकाराचा मार्ग. अरविंदांच्या मते, चळवळीची साधने ही परिस्थितीसापेक्ष असतात किंवा तशी ती असावीत. अरविंदाच्या 'भवानी माता' योजनेचा हेतू मातृभूमीची सेवा करताना सर्वस्व अर्पण करणाऱ्या राजकीय संन्याशांची टोळी तयार करणे हा होता.

अरविंद घोष यांनी सविनय प्रतिकाराची कल्पना मांडून १) आर्थिक बहिष्कार व स्वदेशी. २) शैक्षणिक बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण. ३) न्यायालयीन बहिष्कार व राष्ट्रीय लवाद न्यायालये. ४) कार्यपालिकेतर बहिष्कार व राष्ट्रीय संघटना ५) सामाजिक बहिष्कार आदींचा आग्रह धरला.

राष्ट्रीय शिक्षणाचा विचार सर्व जहाल नेत्यांनी मांडला एवढेच नव्हे तर राष्ट्रीय शिक्षण संस्थांची स्थापनाही त्यांनी केली होती. जहाल नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी ज्या राष्ट्रीय शिक्षण संस्था स्थापन केल्या त्यात प्रामुख्याने बनारस हिंदू विद्यापीठ (बनारस), गुजरात विद्यापीठ (अहमदाबाद), जामिया मिलिया (दिल्ली), काशी विद्यापीठ (बनारस), टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (पुणे), नॅशनल मुस्लिम युनिव्हर्सिटी (अलिगढ), बंगाल नॅशनल युनिव्हर्सिटी (कलकत्ता) यांचा उल्लेख करावा लागतो. भारतात १९२२ पर्यंत एकूण लहान मोठ्या

१२५० राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्था उघडल्या होत्या व त्यात ७७,००० विद्यार्थी शिक्षण घेत होते.

आमची संघशक्ती एकवटून बहिष्कारासारख्या तीव्र चळवळीमुळेच राज्यकर्त्यांची धुंदी उतरू शकते, त्याशिवाय पर्याय नाही असे टिळकांनी म्हटले होते. स्वदेशी चळवळ व बहिष्कार या दोन्ही चळवळीची गरज टिळकांनी प्रतिपादन केली. बहिष्काराची चळवळ ही आर्थिक, औद्योगिक कारणासाठी नाही तर ती राजकीय आहे. बहिष्काराचे दोन फायदे आहेत असे टिळक म्हणत - १) परकियांची अर्थव्यवस्था खिळखिळी होते. २) देशी वस्तूंचे उत्पादन वाढते. बहिष्कारात विदेशी वस्तूंबरोबरच शासन यंत्रणा, न्यायसंस्था व करवसुली यावरील बहिष्कारही टिळकांना अभिप्रेत होता. बहिष्कारामुळे परदेशांत जाणारे करोडो रुपये वाचतात. बहिष्काराच्या तंत्रामुळे मोठी क्रांती होऊ शकते. शत्रूची अर्थव्यवस्था खिळखिळी होते. बहिष्काराच्या चळवळीत समाजातील सर्वच थरांतील लोकांना सहभागी होता येते असे सांगून 'बहिष्काराची परिणामकारकता ही कृतीत आहे, शब्दांत नाही' असे टिळक म्हणत.

**टिळक म्हणत**, राष्ट्रीयत्व हा काही दृश्य पदार्थ नाही; ती एक प्रकारची कल्पना असून ती सतत जागृत ठेवावी लागते तरच ती टिकते. 'स्वराज्या'शिवाय व्यक्तीचा विकास अशक्य आहे. **टिळक म्हणतात**, 'जर भारताला स्वातंत्र्य मिळाले नाही तर औद्योगिक विकास, शैक्षणिक विकास, सामाजिक सुधारणा अशक्य आहेत. हे सर्व स्वराज्याचेच भाग आहेत. याकरिता आमच्या हाती सत्ता असणे आवश्यक आहे.' टिळक स्वराज्याचा अर्थ 'स्वशासन' असा लावत. भारतीय शासन हे आमचे नाही, परकियांचे आहे. ते आम्हाला आमचे शासन पाहिजे. भारतातील शासन ब्रिटिश संसदेने निर्माण केले असून ते संसदेलाच जबाबदार आहे, ते भारतीय जनतेला जबाबदार नाही. भारतीयांना भारतीयांनी निर्माण केलेले शासन पाहिजे व भारतातील शासन हे भारतीय जनतेलाच जबाबदार असले पाहिजे. स्वराज्याची आवश्यकता ही भौतिक, आध्यात्मिक व नैतिक विकासाकरिताही आहे असे ते म्हणत. स्वदेशीच्या संदर्भात सुशिक्षित पांढरपेशा वर्गाची जबाबदारी मोठी आहे असे टिळक म्हणत. जे लोक दरिद्री आहेत किंवा ज्यांना दोन वेळेसच्या जेवणाचीच चिंता आहे ते विदेशी वस्तू, कपडे वगैरे वापरू शकत नाहीत. म्हणून सुशिक्षित वर्गास आवाहन करताना टिळकांनी म्हटले होते, 'हिंदुस्थानचे राज्य लोकांच्या कल्याणासाठी चालविले जावे असे वाटत असेल तर देशी वस्तू व कपडे वापरण्याचा निश्चय करा.'

विदेशी माल स्वस्त पडतो या सुशिक्षितांच्या युक्तिवादावर टीका करून त्यांनी म्हटले होते, 'हे पुस्तकी किडे हे विसरतात की देशकालपरत्वे व्यावहारिक शास्त्रांची तत्त्वे बदलत जातात.' **टिळकांच्या मते**, 'औद्योगिक, राजकीय, सामाजिक, नैतिक किंवा सांपत्तिक यापैकी एक व अनेक किंवा सर्व दिशांनी विचार केला तरीही स्वदेशी चळवळीची आवश्यकता व उपयोग पूर्णपणे सिद्ध होतात. ही गोष्ट आता सर्वांच्या प्रत्ययास आली आहे. एवढेच नव्हे तर सुधारलेल्या राष्ट्रांच्या पूर्वेतिहासावरूनही याच सिद्धांताला पुष्टी मिळत आहे.'

## २) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची वाटचाल ( १९०५ ते १९२० ) :-

१९०७ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात जहाल व मवाळ यांच्यात पडलेली फूट ही स्वातंत्र्य आंदोलनातील एक महत्त्वाची घटना आहे. अर्थात, मवाळ व जहाल यांची भिन्न विचारसरणी व कार्यपद्धती हे सुरत येथील काँग्रेस फुटीचे खरे कारण होते.

**इ.स. १९०५ चे बनारसचे अधिवेशन :-** १९०५ मध्ये बनारस येथे राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन ना. गोखले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या अधिवेशनाला ७५७ प्रतिनिधी हजर होते. प्रतिनिधीत बंगालच्या खालोखाल महाराष्ट्रीयन सदस्यांची संख्या जास्त होती. नागपूरहून डॉ. मुंजे, डॉ. लिमये, माधवराव पाध्ये, बापूजी अणे वगैरे मंडळी हजर होती. ना. गोखले यांनी समतोल भाषण केले होते. कर्झनच्या कामगिरीची तसेच अपयशाची अत्यंत परखड चिकित्सा त्यांनी केली होती. त्यांच्या भाषणाने काँग्रेसमधील दोन्ही गटांतील सदस्यांचे समाधान झाले होते. या अधिवेशनापूर्वी ना. गोखले व लाला लजपतराय यांनी इंग्लंडला जाऊन फाळणी रद्द करण्यासंबंधी ब्रिटिशांचे मत वळविण्याचा प्रयत्न केला होता. पण ती मागणी फेटाळल्याने हिंदी राजकारण तप्त बनले होते आणि त्याच पार्श्वभूमीवर हे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात फाळणीबद्दल सरकारचा निषेध करणारा ठराव पास झाला होता. फाळणी रद्द करावी अशीही मागणी एका ठरावाद्वारे केली गेली. ब्रिटिश युवराजाच्या स्वागताच्या प्रश्नावरून या अधिवेशनात जहाल व मवाळ यांच्यात मतभेद झाले होते. जहालांची इच्छा नसतानाही ठराव मंजूर झाला होता. कारण जहालांचा गट काँग्रेसमध्ये अल्पमतात होता. ना. गोखले यांचा जहालांच्या निःशस्त्र प्रतिकार चळवळीला विरोध होता. नि:शस्त्र प्रतिकाराची चळवळ देशभर सुरू करावी असे जहालांना वाटत होते. पण त्यास मवाळांचा नकार होता. बनारसच्या या अधिवेशनातच जहाल-मवाळ यांच्यातील मतभेद स्पष्ट झाले होते. बिपिनचंद्र पाल यांनी ब्रिटिश मालांवर बहिष्कार टाकावा असा ठराव अधिवेशनात मांडला असता फिरोजशहा मेहता, दिनेश वाच्छा वगैरे मवाळ नेत्यांनी बहिष्काराचे शस्त्र फक्त बंगालपुरते वापरले जावे, संपूर्ण देशात बहिष्काराचे शस्त्र वापरू नये असे आग्रहाने मत मांडले. याच अधिवेशनात इंग्लंडच्या युवराजाच्या भारतभेटीच्या प्रश्नांवरूनही जहाल-मवाळ यांच्यात मतभेद निर्माण झाले. इंग्लंडच्या युवराजाचे स्वागत व अभिनंदन व्हावे अशी मवाळांची इच्छा होती. दडपशाहीचा अवलंब अत्यंत क्रूरपणे करणाऱ्या ब्रिटनच्या राजवटीचे प्रतिनिधी असलेल्या ब्रिटिश युवराजाचे काँग्रेसने मुळीच स्वागत करू नये. स्वागत करणे म्हणजे गुलामी वृत्तीचे प्रदर्शनच करणे होय असे जहाल गटाचे मत होते. मवाळ व जहाल यांच्यातील वैचारिक फरक या अधिवेशनात बराच स्पष्ट झाला होता.

**इ.स. १९०६ चे कलकत्ता अधिवेशन :-** इ.स.१९०६ मध्ये कलकत्ता येथे राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन भरले. दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या या अधिवेशनास

तुरुंगातून बाहेर आले होते व त्यांच्या देशसेवेचा गौरवही होणार होता. कलकत्ता अधिवेशनात जी चतु:सूत्री घोषित केली होती त्यास सुरतच्या या अधिवेशनात अधिकृत मान्यता मिळावी असा जहालांचा प्रयत्न होता. टिळकांनी जहाल व मवाळ यांच्यात समेट घडवून आणण्याचा खूप प्रयत्न केला, पण त्यात त्यांना यश आले नाही.

दुसऱ्या दिवशी अधिवेशनाला पुन्हा प्रारंभ झाला. स्वागताध्यक्ष पं. मदनमोहन मालवीय यांनी अध्यक्ष निवडीसंबंधी अनुमोदनानंतर प्रतिनिधीसमोर मत मांडण्याची टिळकांची सूचना फेटाळून लावली. मालवीय यांनी अध्यक्ष निवडीचा ठराव मंजूर झाल्याचे घोषित केले तेव्हा गोंधळ उडाला. पं. मालवीय यांनी टिळकांना व्यासपीठावरून भाषण करण्यास मज्जाव केला. टिळकांनी आपली बाजू मांडण्यास परवानगी द्यावी अशी विनंती केली. तेव्हा ती फेटाळताच घोषणा, प्रतिघोषणा व व्यासपीठावर पादत्राणे, अंडी, खुर्च्या फेकणे आदी प्रकार झाल्याने सभा तहकूब केल्याचे अध्यक्षांनी घोषित केले. दुसऱ्या दिवशी टिळकांनी पुन्हा समेटाचा प्रयत्न केला. पण त्यात अपयश आले. मवाळांनी स्वतंत्र बैठक घेऊन जहाल गटाची राष्ट्रसभेतून हकालपट्टी केली.

**सुरतच्या फुटीचे परिणाम :- ॲनी बेझंटच्या मते,** 'सुरतेची फूट ही राष्ट्रीय चळवळीच्या इतिहासातील एक दु:खद व खेदजनक घटना आहे.' ब्रिटिश राज्यकर्ते व अधिकाऱ्यांनी या फुटीच्या संदर्भात जाहीर आनंद व्यक्त केला. सुरत येथे राष्ट्रीय काँग्रेस कोलमडली हा आपलाच विजय आहे असे लॉर्ड मिंटो यांनी म्हटले होते. भारत सरकारला होणारा काँग्रेसचा विरोध आता कमी होईल असे त्यांना वाटले. टिळकांनी वारंवार प्रयत्न करूनही मवाळांनी जहाल गटाशी युती करण्याचे टाळले होते. त्यात प्रामुख्याने ना. गोखले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, फिरोजशहा मेहता व दिनेश वाच्छा यांचा समावेश होता. भारतमंत्री मोर्ले यांनी ना. गोखले यांना राजकीय सुधारणांचे आश्वासन दिले होते. सरकारशी सहकार्य केल्याशिवाय राजकीय सुधारणांचा हप्ता मिळणार नव्हता. सुरेंद्रनाथ बॅनर्जीही त्याच विचारांचे होते. जहालवादी विचाराने देशाचे कल्याण होणार नाही अशी मवाळांची भूमिका होती. १९१६ च्या लखनौ अधिवेशनापर्यंत जहालांचा गट काँग्रेसबाहेरच होता व मवाळांचेच वर्चस्व काँग्रेसवर होते. स्टॅन्ले बॉलपोर्ट यांनी सुरत फुटीला जहाल व मवाळ या दोघांनाही दोषी ठरविले आहे. सुरत फुटीमुळे काँग्रेस कमकुवत झाली. राष्ट्रीय चळवळ थंडावली व तिचा प्रभाव १९१६ पर्यंत स्वातंत्र्य चळवळीत पडला नाही हे मात्र नक्कीच.

**इ.स.१९०७ मध्ये सुरत येथील काँग्रेस फुटीच्या वेळी लॉर्ड मोर्ले यांनी भाकीत केले की,** 'मवाळ-जहाल गटाची फारकत म्हणजे जहालांचाच विजय आहे. यावेळी जहाल गट काँग्रेसबाहेर फेकला गेला असला तरी नजीकच्या भविष्यात काँग्रेस त्यांच्याच हाती जाण्याची ही एक पूर्वसूचना आहे.' लॉर्ड मोर्ले यांचे हे भाकीत पुढे खरे ठरले. इ.स.१९१६ नंतर काँग्रेसवर जहाल गटाचे पूर्णत: वर्चस्व प्रस्थापित झाले होते.

इ.स.१९०७ च्या सुरतच्या अधिवेशनानंतर मवाळ व जहाल गटांची फाटाफूट

जहाल व मवाळ यांच्यातील फूट ब्रिटिशांना हवीच होती, कारण त्यामुळे काँग्रेस कमकुवत होणार होती. Divide & Rule 'फोडा व राज्य करा' हे ब्रिटिशांच्या राज्य कारभाराचे सूत्रच होते. इ.स.१९०७ नंतर काँग्रेस प्रभावशून्य, नेतृत्वहीन झालेली दिसते. जहालांच्या गटाची काँग्रेसमधून हकालपट्टी झालेली होती. मवाळांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसचे प्रत्येक वर्षी अधिवेशने घेणे, ठराव पास करणे व ब्रिटिश सरकारशी सहकार्य करणे अशीच एकूण काँग्रेसची कार्यपद्धती होती. इ.स.१९०८ मध्ये अलाहाबादला काँग्रेसचे खास अधिवेशन घेण्यात येऊन त्यात काँग्रेसची घटना तयार करण्यात आली. ब्रिटिश साम्राज्याच्या अंतर्गत स्वयंशासनाचे अधिकार मिळवणे हे काँग्रेसचे अंतिम उद्दिष्ट मवाळांनी निश्चित केले व त्यासाठी सनदशीर मार्गांचा अवलंब करावा हे ठरले. १९०७ नंतर ब्रिटिशांना काँग्रेसची फारशी भीती राहिली नाही. कारण तिने मवाळ धोरणाचा, सनदशीर मार्गांचा अवलंब केल्यामुळे तसेच ती पूर्वीपेक्षा निष्क्रिय व प्रभावशून्य झाल्याने तिची दखल घेण्याची ब्रिटिशांना गरज राहिली नाही. ब्रिटिशांवर दडपण आणण्याची क्षमताच काँग्रेसमध्ये राहिली नाही.

इ.स. १९०९ च्या कायद्यानुसार मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याचे ब्रिटिशांनी मान्य केले. परंतु मुस्लिम लीगच्या नेत्यांच्या भूमिकेत बदल घडून आला. त्याला दोन कारणे कारणीभूत ठरली –

१) इ.स.१९११ मध्ये बंगालची फाळणी रद्द करण्यात आल्यामुळे मुस्लिम नाराज झाले.

२) तुर्कस्तानाबाबत इंग्लंडचे प्रतिकूल धोरण.

मुस्लिम नेत्यांना हिंदू-मुस्लिम ऐक्याचे महत्त्व वाटू लागले. ब्रिटिशांचे अंतरंग त्यांच्या लक्षात आले. मुस्लिम लीगने आपल्या घटनेत बदल करून काँग्रेसचे राजकीय उद्दिष्ट हेच मुस्लिम लीगचेही उद्दिष्ट आहे असे घोषित केले. त्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी देशातील इतर संघटनांशी व गटांशी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली. मुस्लिम लीगच्या या बदललेल्या पार्श्वभूमीवर इ.स.१९१३ मध्ये काँग्रेसचे अधिवेशन कराची येथे भरवले गेले व त्याचे अध्यक्षपद नवाब सईद अहमद यांना देण्यात आले. इ.स.१९१५ मध्ये काँग्रेस व मुस्लिम लीग या दोन्हीची अधिवेशने मुंबईला एकाच वेळी भरवली गेली. या दोन्ही संघटनांची एक संयुक्त समिती स्थापन करून तिच्यामार्फतच राजकीय अधिकारांची मागणी करावी असे ठरले.

सुरत येथे काँग्रेसमध्ये जी फूट पडली त्यास प्रामुख्याने टिळकांचा आडमुठेपणा जबाबदार आहे, असे मवाळ मंडळी म्हणत होती. वास्तविक अधिवेशनात टिळकांनी अरविंद घोष या जहाल तरुणास आवरण्याचा प्रयत्न केला होता. सुरतेच्या अधिवेशनात हुल्लडबाजी होऊन काँग्रेस फुटली. त्याबद्दलचा दोष टिळकांकडे नसून आपल्याकडे येतो असे कालांतराने अरविंद घोष यांनी कबूल केले होते.